**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## भौतिकशास्त्र विभागातील अकरा विद्यार्थी नेट/सेट/जेस्ट/गेट परीक्षेत उत्तीर्ण
## भौतिकशास्त्र विभागाचा बहुमान

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील अकरा विद्यार्थी नेट/सेट/जेस्ट/गेट ही काठीण्य पातळीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, त्याबद्दल त्यांचा कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व व्य.प. सदस्य तथा भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार यांनी अभिनंदन केले आहे. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने नुकतेच स्थापनेचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे केले. गेल्या पंचवीस वर्षात नेट/सेट/जेस्ट/गेट सारख्या राष्ट्रीय पातळीवर छप्पन्न विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. मागील पाच वर्षात चवतीस उमेदवार पात्र झाले आहेत. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.के. ओमनवार यांचे प्रामुख्याने विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभत असते. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त परिश्रम करावे, यासाठी ते सातत्याने प्रोत्साहन देतात. त्यांच्या नेतृत्वाखाली भौतिकशास्त्र विभाग सातत्याने प्रगतीपथावर आहे. भव्यदिव्य भौतिकशास्त्र विभागाची इमारत विद्यापीठ परिसरात निर्माण झाली आहे.

भौतिकशास्त्र विभागातील शिक्षक हे सुद्धा सातत्याने विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त ज्ञान देण्याकरीता प्रयत्नरत असतात. विलास हिरणवाले, प्रणोती खावने, पंढरी अंभोरे, कल्याणी आत्राम, डॉ. अतुल गावंडे, धनश्री कोठेकर, आदित्य शेंडे, निखील भगत, चैनाराम, अविनाश खंडेराव यांचे या नेत्रदीपक यशाबद्दल सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ३१/०५/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी